# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्र. मुमाआ/नों. क्र. २००८२२/२०/अ. क्र. ६०६/२३/०१**

**श्री. प्रशांत मधुकर पेडणेकर**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (जलकामे) एल विभाग**
बृहन्मुंबई महानगरपालिका, एल विभाग यांचे कार्यालय इमारत,लक्ष्मणराव यादव मंडई,
पहिला मजला, स.गो.बर्वे मार्ग, कुर्ला (प), मुंबई ४०००७०.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता एल विभाग**
बृहन्मुंबई महानगरपालिका, एल विभाग यांचे कार्यालय इमारत,लक्ष्मणराव यादव मंडई,
पहिला मजला, स.गो.बर्वे मार्ग, कुर्ला (प), मुंबई ४०००७०.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १६.०६.२०२३**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपीलीय अधिकारी | : | उपस्थित (प्रतिनिधी) |

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २७.०८.२०१९ | ०४.१२.२०१९ | ०१.१०.२०१९ | १२.१२.२०१९ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. १०.०२.२०२० रोजीच्या अर्जान्वये चुकीची व खोटी माहिती पुरविणे (महानगरपालिकेच्या रेकॉर्डवर नसलेली) असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपिलार्थी यांनी त्यांचा अर्ज दि. २७.०८.२०१९ अन्वये खालील माहिती विचारलेली आहे:-

१) "महानगरपालिकेने जोडणी क्र. LXS ६३६२००७ मध्ये सामाईक स असलेल्या सर्व व्यक्तीची नावे असलेली एक प्रत माहितीच्या अ अधिकारात देण्यात यावी.

२) श्रीकांत काष्टे यांनी केलेल्या अनधिकृत नळजोडणीची तक्रार दिल्यावर त्यांना महानगरपालिकेने पाठविलेल्या नोटीशीची एक प्रत मला माहिती अधिकारात देण्यात यावी. (तक्रार क्र. १) ०७२२३८१९४९ (२) ०७२२३८७४८७ (३) ०७२२३९३८२८ (४) ०७२२३९६२२७

**क्र. मुमाआ/नों. क्र. २००८२२/२०/अ. क्र. ६०६/२३/०१**

३) श्रीकांत काष्टे यांना महानगरपालिकेने स्वतंत्र नळजोडणी दिली असेल तर त्याची कागदपत्रे माहितीच्या अधिकारात देण्यात यावी.

४) श्रीकांत काष्टे यांना अनधिकृत जोडणीची तक्रार आल्यावर महानगरपालिकेकडून नोटीस कोणत्या विशेष अधिकारात पाठवली गेली नाही याची माहिती माहितीच्या अधिकारात देण्यात यावी.

५) नगरसेवक निधीतून जोडण्यात आलेल्या ३" व्यासाच्या २ पाईपलाईन मधून किती अधिकृत जोडण्या महानगरपालिकेकडून केल्या गेल्या आहेत त्याची माहिती जोडणी क्रमांकासह मला माहितीच्या अधिकारात देण्यात यावी (उपरोक्त ठिकाणी)

६) सदर ३" व्यासाच्या दोन पाईपलाईन टाकण्याचे कंत्राट कोणत्या कंत्राटदाराला देण्यात आले होते त्याबददलची माहिती मला माहितीच्या अधिकारात देण्यात यावी (सुंदरबाग दशरथ शेठ चाळ येथे)"

अपिलार्थी यांनी द्वितीय अपील अर्जासोबत जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि.०४-१२-२०१९ व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश दि.१२-१२-२०१९ संलग्न केले आहेत.

**जन माहिती अधिकारी यांनी दि.०४-१२-२०१९ रोजी खालील उत्तर दिले आहे :**

| क्र. | मागितलेली माहिती | माहितीचा तपशील |
|---|---|---|
| १ | "महानगरपालिकेने जोडणी क्र. LXS ६३६२००७ मध्ये सामाईक स असलेल्या सर्व व्यक्तींची नावे असलेली एक प्रत माहितीच्या अ अधिकारात देण्यात यावी. | "सदर माहितीबाबत कार्यालयाच्या अभिलेखावर उपलब्ध असलेली माहितीची प्रत सोबत जोडत आहे. |
| २ | श्रीकांत काष्टे यांनी केलेल्या अनधिकृत नळजोडणीची तक्रार दिल्यावर त्यांना महानगरपालिकेने पाठविलेल्या नोटीशीची एक प्रत मला माहिती अधिकारात देण्यात यावी. (तक्रार क्र. १) ०७२२३८१९४९ (२) ०७२२३८७४८७ (३) ०७२२३९३८२८ (४) ०७२२३९६२२७ | सदर बाबत आपणांस या पुर्वीच माहिती देण्यात आलेली आहे. |
| ३ | श्रीकांत काष्टे यांना महानगरपालिकेने स्वतंत्र नळजोडणी दिली असेल तर त्याची कागदपत्रे माहितीच्या अधिकारात देण्यात यावी. | सदर व्यक्तीस महानगरपालिकेकडून त देण्यात स्वतंत्र नळजोडणी देण्यात आलेली नाही. |

**क्र. मुमाआ/नों. क्र. २००८२२/२०/अ. क्र. ६०६/२३/०१**

| | | |
|---|---|---|
| ४ | श्रीकांत काष्टे यांना अनधिकृत जोडणीची तक्रार आल्यावर महानगरपालिकेकडून नोटीस कोणत्या विशेष अधिकारात पाठवली गेली नाही याची माहिती माहितीच्या अधिकारात देण्यात यावी. | श्री. श्रीकांत काष्टे यांच्या नावे महापालिकेकडून कोणत्याही प्रकारची अधिकारात जलजोडणी देण्यात आलेली नाही. श्री. श्रीकांत काष्टे हे जलजोडणी क्र. LXR२७५१००३ मध्ये सभासद आहेत. |
| ५ | नगरसेवक निधीतून जोडण्यात आलेल्या ३" व्यासाच्या २ पाईपलाईन मधून किती अधिकृत जोडण्या महानगरपालिकेकडून केल्या गेल्या आहेत त्याची माहिती जोडणी क्रमांकासह मला माहितीच्या अधिकारात देण्यात यावी (उपरोक्त ठिकाणी) | या कार्यालयाकडून नगरसेवक निधीतून जोडण्या कोणत्याही प्रकारची जलवाहीणी ची माहिती टाकण्यासाठी प्रस्ताव कळविण्यात येत नाही तसेच सदर ठिकाणची अधिकृत जलजोडणीची यादी सोबत जोडीत आहे. |
| ६ | सदर ३" व्यासाच्या दोन पाईपलाईन टाकण्याचे कंत्राट कोणत्या कंत्राटदाराला देण्यात आले होते त्याबददलची माहिती मला माहितीच्या अधिकारात देण्यात यावी (सुंदरबाग दशरथ शेठ चाळ येथे)" | सदर माहिती या कार्यालयाशी संबंधीत नसून स.अ.ज.का. (बांधकामे) पू.उ. यांच्याशी संबंधीत आहे." |

**प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.१२-१२-२०१९ रोजी खालील आदेश दिले आहेत :**

"श्री. प्रशांत मधुकर पेडणेकर, अपीलकर्ता यांनी त्यांचे दिनांक ०१.१०.१९ रोजीच्या अपीलाव्दारे सहा. अभियंता (जलकामे) 'एल' विभाग (यापुढे जन माहिती अधिकारी असा उल्लेख करण्यात येत आहे) यांनी त्यांना माहिती अधिकार अधिनियम, २००५ अन्वये केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने उत्तर अगर माहिती दिली नसल्याचे नमूद केले आहे.

श्री. प्रशांत मधुकर पेडणेकर, अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ०१.१०.१९ रोजीच्या अपील अर्जावर सुनावणीस हजर रहाणेकरीता दि. ०४.१२.१९ रोजी बोलविले. सदर सुनावणीस अपिलकर्ता श्री. प्रशांत मधुकरे पेडणेकर हे उपस्थित होते. तसेच जन माहिती अधिकारी श्री. कुलकर्णी, सहा. अभियंता (जलकामे) 'एल' विभाग हे उपस्थित होते.

सुनावणीच्यावेळेस अपीलकाराने त्यांना मागितलेल्या माहितीचे उत्तर अगर माहिती मिळाली नसल्याचे सांगितले. मात्र त्यांनी पत्राचे उत्तर दिले असल्याचे सांगितले. अपीलकाराने त्यांना मुद्देसुद उत्तर व माहिती विनामुल्य देण्यात यावी, अशी विनंती केली. त्यावर जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलकारास हवी असलेली माहिती १० दिवसाच्या आत विनामुल्य देण्यात येईल, असे मान्य केले.

**क्र. मुमाआ/नों. क्र. २००८२२/२०/अ. क्र. ६०६/२३/०१**

जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलकारास नमूद अर्जातील मागितलेल्या माहितीचे मुद्देसुद उत्तर द्यावे. तसेच अपीलकारास हवी असलेली माहिती १० दिवसाच्या आंत विनामुल्य देण्यात यावी. वरील बाबींचा विचार करून सदर अपील निकाली काढण्यात येत आहे."

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी सादर केले की, मुद्दा क्र.२ ची माहिती त्यांना प्राप्त नाही व मुद्दा क्र.४ मध्ये जी माहिती दिली आहे ती चुकीची आहे. कारण श्री.श्रीकांत काष्टे- LXR२७५१००३ यामध्ये सभासद नाही. ही नळ जोडणी श्री.म्हात्रे व इतर बाबत आहे व श्री.म्हात्रे यांनी लेखी दिले आहे की, यामध्ये श्री.श्रीकांत काष्टे सभासद नाहीत.

माहिती अधिकारी यांनी सादर केले की, मुद्दा क्र.४ चे उत्तर श्री.म्हात्रे यांचेकडून विचारुन देण्यात आले होते. तथापि, या नळ जोडणीचे मूळ कागदपत्र उपलब्ध नाहीत. याबाबत माहिती अधिकारी यांनी शहानिशा करुन सुधारित उत्तर अपिलार्थीला देण्यात यावे व मुद्दा क्र.२ बाबत दिलेली माहिती अपिलार्थीला पुन्हा उपलब्ध करुन द्यावी.

सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

माहिती अधिकारी यांनी सादर केले की, मुद्दा क्र.४ चे उत्तर श्री.म्हात्रे यांचेकडून विचारुन देण्यात आले होते. तथापि, या नळ जोडणीचे मूळ कागदपत्र उपलब्ध नाहीत. याबाबत माहिती अधिकारी यांनी शहानिशा करुन सुधारित उत्तर अपिलार्थीला देण्यात यावे व मुद्दा क्र.२ बाबत दिलेली माहिती अपिलार्थीला पुन्हा उपलब्ध करुन द्यावी.

**आदेश**

**अपिल निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission ★ Maharashtra ★

(सुनील पोरवाल)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : १६.०६.२०२३